दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००५/२०१७-१८
दि.१९/०१/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.सोहेल मु. खान, ................अपिलार्थी
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
सहा.आयुक्त (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांचेकडे दि.०४/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ६० अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वयंप्रेरणेने करावयाचे प्रकटन याबाबतची विनिर्दिष्ट माहिती उपलब्ध करुन मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती उपलब्ध करुन मिळविण्यासाठी विहित नमुन्यात विनंती अर्ज करुन सुध्दा मला कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन दिली नसुन विनंती अर्ज नाकारण्यात आला. याकरिता अपिलार्थी यांनी दि.०९/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०१/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.सा.प्र./२०४/२०१८ दि.१५/०१/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०४/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन दिली नसुन विनंती अर्ज नाकारण्यात आला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** सदर माहिती अधिकारातील अर्ज कोणत्या विभागाचा आहे याबाबत संभ्रम निर्माण झालेला असल्य कारणाने अर्ज वर्ग करता आला नाही. सदरचा अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी, सार्व.बांधकाम, नगररचना विभाग व कर विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. सोबत माहिती अधिकारातील अर्ज व अपिल अर्ज जोडत आहे. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१. 16/02/18.

२) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (सा.प्र.) 16/2/18

३) जन माहिती अधिकारी, कर विभाग
(सोबत माहिती अधिकारातील अर्ज जोडला आहे.) for 16/2/18

प्रत:- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,

१) जन माहिती अधिकारी, सार्व. बांधकाम विभाग
(सोबत माहिती अधिकारातील अर्ज जोडला आहे.)

२) जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग
(सोबत माहिती अधिकारातील अर्ज जोडला आहे.)

पोच 28/2/18

प्रत:- माहितीस्तव,
प्रथम अपिलीय अधिकारी,
सार्व. बांधकाम विभाग,
नगररचना विभाग.